राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. [illegible] — अपीलकर्ता
प्लॉट नंबर, १०७८, [illegible] राजारामपुरी,
१२वी गल्ली, कोल्हापूर

विरुद्ध

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर — प्रतिवादी

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, [illegible] विभाग, कोल्हापूर
महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | [illegible] / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. [illegible] |

३ उपस्थिती

अपीलकर्ता — श्री. [illegible]
प्लॉट नंबर, १०७८, [illegible], राजारामपुरी,
१२वी गल्ली, कोल्हापूर

अपिलीय अधिकारी तथा — सहाय्यक आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर श्री. [illegible]

जन माहिती अधिकारी तथा — वरिष्ठ लिपिक, [illegible] विभाग, कोल्हापूर
महानगरपालिका, कोल्हापूर
श्री. [illegible]

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याचा दिनांक | दि. | [illegible] |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने माहिती दिल्याचा दिनांक | दि. | [illegible] |
| ६ | प्रथम अपील केल्याचा दिनांक | दि. | [illegible] |
| ७ | अपिलीय अधिकाऱ्याने निर्णय दिल्याचा दिनांक | दि. | [illegible] |

८ [illegible]

## विवेचन

सन १९६७ मधील जिल्हाधिकाऱ्यांकडील अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी १२ मुद्यांचे स्पष्टीकरण पंधरा दिवसांच्या आत प्रांताधिकारी, करवीर यांच्यामार्फत सादर करण्याचे आदेश तत्कालीन नगराध्यक्षांना दिले होते. त्याबाबतची माहिती नस्तीत उपलब्ध नसल्याच्या कारणावरून दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीपसिंह शिवाजीराव धनवडे यांनी केली. याबाबतच्या पत्रावर 'श्री. राजे' असा उल्लेख असून ते निवृत्त झाले असले तरी त्यांच्याकडून वस्तुस्थितीची माहिती मिळविता येईल, असेही प्रतिपादन श्री. धनवडे यांनी केले.

संबंधित अभिलेख सन १९६४ मधील असून कसून शोध घेऊनही प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे माहिती देता आली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विशी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी केले.

संबंधित कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी वर्गवारीनुसार तपासून त्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विशी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अहवाल अद्याप अप्राप्त आहे, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, विशी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. श्रीकांत गोविंद देवकर यांनी [illegible] दि. ३०.२.२०१० पर्यंत [illegible]

पुणे

दि. ११.०.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रकांत आप्पासाहेब खेडे — अपीलकर्ता
मु. पो. आणूर, ता. कागल, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. चंद्रकांत आप्पासाहेब खेडे<br>मु. पो. आणूर, ता. कागल, जि. कोल्हापूर |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर<br>तर्फे प्रतिनिधी श्री. शरद गोसावी |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,<br>कोल्हापूर श्री. शरद गोसावी |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

श्री गजानन शिक्षण संस्था, अणूर, ता. कागल या संस्थेच्या पिंपळगाव विद्यालयाच्या मुख्याध्यापिकेच्या संदर्भात मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अर्ज शाळेकडे पाठवून दिल्यामुळे मिळाली नाही. प्रभारी मुख्याध्यापिका नियुक्तीचा संस्थेच्या लेटर हेडवरील प्रस्ताव सचिवांच्या सहीने परत मागविण्यात आला व शिक्षण अधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी तो परत पाठविला. संस्थेच्या पत्रावर ज्यांची सही आहे, ते संस्थेचे सचीव नाहीत व लेटरहेड बनावट आहे. मुख्याध्यापिकेची रजेनंतर रूजू झाल्याची सही देखील बनावट आहे. मुख्याध्यापिकेच्या विरूध्द दिलेल्या तक्रार-अर्जावरील माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. चंद्रकांत आप्पासाहेब खेडे यांनी केली.

संबंधित माहिती शाळेच्या स्तरावरील असल्यामुळे माहिती-मागणीचा श्री. खेडे यांचा अर्ज शाळेकडे पाठविला. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या निर्णयानुसार कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती श्री. खेडे यांना दिली. कागदपत्रे बनावट असल्याचे आरोप हे मुख्याध्यापिका व संस्थेचे संचालक यांच्यातील वादातून केले जात आहेत. संस्थेच्या अध्यक्षांनी दि.१५.९.२००८ रोजी मुख्याध्यापिकेविरूध्द शिक्षण अधिकाऱ्यांकडे अर्ज केला व त्यावरील कार्यवाहीची माहिती श्री. खेडे यांनी दि. १९.९.२००८ च्या अर्जान्वये मागितली. संस्थांतर्गत वाद धर्मादाय आयुक्तांपुढे प्रलंबित आहे. प्रशासकीय कार्यवाहीची मागणी व कागदपत्रे बनावट असण्यासारखे आरोप माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी यांनी केले.

अपीलकर्त्याचे प्रशासकीय कार्यवाहीविषयक आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. तसेच एखाद्या कर्मचाऱ्यांविरूध्द चौकशी / कारवाई करून

माहिती द्यावी, अशी मागणी या अधिनियमांतर्गत करता येणार नाही. मात्र संबंधित अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती एक आठवड्यात अपीलकर्त्यास वस्तुस्थितीनुसार द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार संबंधित शाळेला समक्ष भेट देऊन अध्यक्षांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली. संस्थेच्या अधिकृत व्यवस्थापनाबाबत व्यवस्थापनाअंतर्गत वाद असून धर्मादाय उपायुक्त, कोल्हापूर यांच्याकडे प्रकरण प्रलंबित आहे, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर श्री. शरद गोसावी यांनी दि. २५.३.२००९ च्या पत्रान्वये पूरक कागदपत्रांसह आयोगाला सादर केला. हा अहवाल लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अपेक्षित असलेली कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी पूर्ण केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि. ३०.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिनकर साधू वाघमारे — अपीलकर्ता
मु. सांगवी, पो. भोसे, ता.कोरेगांव, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव
ता. कोरेगाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, कोरेगाव, ता. कोरेगाव, जि. सातारा श्रीमती किर्ती नलावडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, कोरेगाव ता. कोरेगाव, जि. सातारा श्रीमती स्मिता पवार | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.३.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिनकर साधू वाघमारे यांनी मागणी केलेल्या जुन्या शर्तीच्या सन १९७५ मधील आदेशाची प्रमाणित नक्कल, मूळ कागदपत्र आढळ होत नसल्याने देता आली नाही. संबंधित अभिलेख कायम स्वरूपी जतनाचा असूनही व अभिलेखपालांनी शोध घेऊनही मिळत नसल्याने नक्कल देता आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार,

कोरेगाव श्रीमती स्मिता पवार यांनी सांगितले. या संदर्भात संबंधित कर्मचाऱ्यांना नोटिसा काढून त्यांचा खुलासा मागितला होता, परंतु संबंधित कागदपत्रे ३३ वर्षांपूर्वीची असून आपल्याकडून गहाळ झालेली नाहीत, असे त्यांनी लेखी दिले आहे. या संदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी, सातारा यांना सादर करण्यात आला असून पुढील कार्यवाहीबाबत मार्गदर्शनाची विनंती करणारी तीन स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगाव श्रीमती किर्ती नलावडे यांनी नमूद केले.

संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन आठ दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा, तसेच अभिलेख उपलब्ध न झाल्यास संबंधित काळातील अभिलेख जतनाची जबाबदारी असणाऱ्यांवर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख, २००५ अन्वये फौजदारी कारवाई करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार सन १९७५ पासून कोरेगाव तहसील कार्यालयातील अभिलेख कक्षात काम करणाऱ्या तीन लिपिकांना नोटिसा काढण्यात आल्या, मात्र अभिलेख उपलब्ध होऊ शकले नाहीत. अपीलकर्त्याने याच विषयासंदर्भात लोकायुक्तांकडे अर्ज केला होता. त्यानुसार तहसीलदार, कोरेगाव यांच्या संबंधित आदेशाने झालेला फेरफार पुनर्विलोकनात घ्यावा, असे आदेश लोकायुक्तांनी उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा यांना दिले होते. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली. परंतु श्री. वाघमारे यांच्या विनंतीनुसारच 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा निर्णय अप्पर जिल्हाधिकारी, सातारा यांनी दि. ११.९.२००८ रोजी दिला आहे, असा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, कोरेगांव श्रीमती किर्ती नलावडे यांनी दि. ७.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. या बाबी लक्षात घेता अपीलकर्त्याच्या मूळ मागणीवर आवश्यक कार्यवाही करण्यात आल्याचे दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रघुनाथ सावळा जाधव
अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा — उत्तरवादी

**१. जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा
**२. जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. रघुनाथ सावळा जाधव<br>अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा — अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा<br>श्री. सतीश यादवराव भोसले<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा<br>श्री. सुधाकर रावजी पाटील<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा — नगर भूमापन अधिकारी, सातारा<br>श्री. मोहन सदाशिव काळे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जमिनीला सन १९७३-७४ साली गट योजनेपासून केलेले चुकीचे फेरफार रद्द व्हावेत. सन १९८६ पासून नगर भूमापन अधिकाऱ्यांकडे प्रकरण वारंवार मांडूनही दुरूस्ती केली जात नाही, त्या संदर्भातील उतारे व नकाशे दिले जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रघुनाथ सावळा जाधव यांनी केली.

सन १९८६ मध्ये गावठाण हक्क चौकशीच्या वेळी नकाशा चुकीचा झाल्याची श्री. जाधव यांची तक्रार आहे. त्याबाबत अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांच्याकडे त्यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील करणे आवश्यक आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांनी केले. श्री. जाधव यांच्या मागणीबाबत करावयाच्या कार्यवाही विषयी मार्गदर्शन त्यांनी केले आहे. त्यानुसार त्यांनी केलेले अपील सुनावणीला घेण्याची कार्यवाही करीत आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा श्री. सतीश यादवराव भोसले यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याची मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तथापि मूळ कागदपत्रात झालेला बदल कोणत्या कागदपत्राच्या आधारे करण्यात आला, त्याची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा श्री. सुधाकर रावजी पाटील यांनी श्री. जाधव यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २८.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.नंदकुमार मनोहर पानसरे
७९०, वेताळ पेठ, भोर,
ता.भोर, जि.पुणे ४१२ २०६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलीस, चव्हाणनगर, पाषाण,
पुणे-८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** पोलीस उप अधीक्षक,
पुणे ग्रामीण पोलीस, चव्हाणनगर, पाषाण,
पुणे-८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३७/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम तारीख | दि.२७.०५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.०८.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२५.०९.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.१०.२००६ |
| ६ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि.२७.०५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये या अपीलाचा समावेश होता. दि.३.१२.२००७ व दि.१७.१२.२००७ च्या अर्जावर उत्तर दिले नाही, म्हणून नियमानुसार दंड करावा. तसेच अपीलकर्त्याला रु.६४,६८५/- नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात यावेत, असे अपीलकर्ता श्री.नंदकुमार मनोहर पानसरे यांनी नमूद केले आहे. तसेच तद्नंतर राज्य माहिती आयोगास वेळोवेळी पत्रव्यवहार करुन, तसेच

दि.१२.१०.२००९ व दि.२३.११.२००९ चे निवेदनाद्वारे त्यांच्या दि.१७.१२.२००७ च्या निवेदनाची चौकशी करुन व १२% व्याजाने योग्य नुकसानभरपाई मिळण्याची व संबंधित अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई होण्याची मागणी करणारे अर्ज आयोगाकडे केले आहेत.

या प्रकरणी मूळ अर्जाबाबत श्री.पानसरे यांच्या प्रथम अपिलावर अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी दि.१९.१०.२००६ रोजी दिलेले उत्तर योग्य आहे. तसेच 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये सादर केलेल्या निवेदनामध्ये अपीलकर्त्याची नुकसानभरपाई व कारवाईची मागणी ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नसल्याचे व श्री.पानसरे यांनी त्यांचे मागणीबाबत योग्य त्या सक्षम न्यायालयात दावा दाखल करावा व आदेश मिळवावेत, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण श्री.विश्वास नांगरे-पाटील यांनी नमूद केले आहे.

श्री.पानसरे यांच्या प्रस्तुत विषयीच्या अनुषंगिक अपील क्र.३२२/पुणे वर आयोगाने यापूर्वीच निर्णय दिला असून अपील अमान्य करण्यात आले आहे, याची श्री.पानसरे यांनी नोंद घ्यावी व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेबाहेरील विषयाबाबत आयोगाकडे वारंवार अर्ज, पत्रव्यवहार व अपिले करु नयेत, अशी समज श्री.पानसरे यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक हरीबा साळुंखे — अपीलकर्ता
६/१२, ताडदेव पोलिस लाईन, ताडदेव,
मुंबई-३४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा, जिं.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. विनायक हरीबा साळुंखे<br>६/१२, ताडदेव पोलिस लाईन, ताडदेव,<br>मुंबई-३४ |
| | **अपिलीय प्राधिकारी** तथा | जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा,<br>जि.सातारा श्री. संतोष भोसले |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा,<br>जि.सातारा श्री. गोविंद अनंत मुळ्ये |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विनायक हरीबा साळुंखे यांनी जमिनीच्या नकाशाची नक्कल मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांना माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांना कळविले, माहिती मागणीचा मूळ अर्ज प्राप्त न झाल्याने अपीलकर्त्यास तसे कळविले. परंतु श्री. साळुंखे यांनी मूळ अर्ज न पाठविता जिल्हाधिकाऱ्यांकडे अपील केले. त्यांनी ते अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांच्याकडे पाठविले. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा यांना सूचना देण्यात आल्याचे नमूद करुन त्यांच्याशी संपर्क साधण्यास अपिलीय प्राधिकाऱ्यांनी कळविले, परंतु अपीलकर्त्याने संपर्क साधला नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, सातारा श्री. गोविंद अनंत मुळ्ये व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सातारा श्री. संतोष भोसले यांनी केले. प्रथम अपिलाची सुनावणी, राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेला 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' व आयोगापुढील सुनावणी या तीनही तारखांना अपीलकर्ता उपस्थित नसल्याचे त्यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २५.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती कलावती रघुनाथ खरात — अपीलकर्ता
द्वारा रघुनाथ मारूती खरात
२२/१५५५, अभ्युदय नगर, मुंबई-३३

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा<br>तर्फे प्रतिनिधी श्री. पी. एन. हिरामणी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा<br>श्री. एन.एल. कुंभारे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

महाराणी सईबाई भोसले सहकारी गृह निर्माण संस्था मर्या., लोणंद या संस्थेत केलेले भूखंड वाटप बेकायदेशीर असून आपल्याला वारंवार मागणी करूनही भूखंड दिलेला नाही, अशी

अपीलकर्त्या श्रीमती खरात यांची तक्रार आहे. त्या अनुषंगाने, आपल्याला भूखंड देण्याबाबत सादर केलेला प्रस्ताव आदीची माहिती व भूखंड देण्याची मागणी श्रीमती कलावती रघुनाथ खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे.

सन १९८३ पासून श्रीमती खरात भूखंड मिळण्यासाठी अर्ज व अपिले करीत आहेत. त्याबाबतची सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. सुमारे ३० ते ४० अर्ज त्यांनी केले असून त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. त्यांना भूखंड देण्याबाबतच्या सर्व पत्रव्यवहाराची व कार्यवाहीची माहिती देणारी संचिका त्यांना अवलोकनासाठीही उपलब्ध करून देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री. एन. एल. कुंभारे यांनी केले.

अपीलकर्त्याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २७.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भरत शिवाजी चव्हाण
तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भरत शिवाजी चव्हाण
तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.प्रकाश बाबुराव साळुंखे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.किसन मारूती धायगुडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.१०.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या जागेवरील अतिक्रमणाच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा यांनी लपवून भ्रष्टाचाराला पाठीशी घातले. माहिती म्हणून अनेक कोरी पाने दिली. आपल्या वडिलोपार्जित शेतजमिनीत आपल्या व आपल्या घरातील लोकांच्या संमतीविना इंदिरा आवास योजनेतील घरकुले अनधिकृतपणे बांधून शासनाची व आपली फसवणूक केली. अन्य व्यक्तीला अर्ज करण्यास सांगून आपण सर्व माहिती प्राप्त करून घेतली, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भरत शिवाजी चव्हाण यांनी केले.

श्री.चव्हाण यांचा माहिती मागणीचा मूळ अर्ज मिळाला नव्हता. अपिलीय प्राधिका-यांकडील त्यांच्या अपिलानंतर तो मागविला असता, त्यांनी केवळ गट क्रमांकाचा उल्लेख केल्याचे आढळले. त्यात व्यक्तींची नावे नमूद केलेली नव्हती, म्हणून माहिती देता आली नाही. श्री.हंकारे यांनी मागितल्यानुसार तीच माहिती सर्व उताऱ्यांसह रजिस्टर्ड टपालाने व अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार नि:शुल्क दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.किसन मारूती धायगुडे यांनी केले. सर्व्हे क्रमांक हा गावठाणाचा असल्याने व्यक्तीची नावे दिल्यास माहिती देता येईल, असे श्री.चव्हाण यांना कळविले होते. परंतु त्यावर त्यांनी प्रतिसाद न दिल्यामुळे माहिती देता आली नव्हती, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगाव,

ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.प्रकाश बाबुराव साळुंखे यांनी नमूद केले. माहिती म्हणून कोरी पाने दिली हे अपीलकर्ता यांचे म्हणणे खोटे असल्याचे त्यांनी संबंधित कागदपत्रांसह नमूद केले.

कोऱ्या पानांचे शुल्क घेतल्याचे दिशाभूल करणारे निवेदन केल्याबद्दल अपीलकर्त्याला समज देण्यात येत आहे.

श्री.चव्हाण यांना अन्य व्यक्तीच्या अर्जानुसार माहिती मिळाली आहे. परंतु मूळ अर्जात गट क्रमांक नमूद केलेला असताना ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील माहिती देणे अशक्य नव्हते. अर्जात व्यक्तींची नावे नमूद केली नसल्यामुळे माहिती देता आली नाही, हे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.किसन मारूती धायगुडे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.प्रकाश बाबुराव साळुंखे यांचे प्रतिपादन सार्वजनिक कारभारातील पारदर्शता दर्शविणारे नाही. हे लक्षात घेता मूळ माहितीची सत्यता तपासणे आवश्यक ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) आपल्या मालकीच्या वडिलोपार्जित जमिनीवर इंदिरा आवास योजनेतील घरकुले अनधिकृतपणे बांधली असून त्याबाबतची नेमकी माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, तडवळे(संमत वाघोली), ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.किसन मारूती धायगुडे व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.प्रकाश बाबुराव साळुंखे यांनी दिली नाही, या अपीलकर्ता श्री.भरत शिवाजी चव्हाण यांच्या तक्रारीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी चौकशी करून दि.२५.२.२०१० पर्यंत वस्तुस्थितीवर आधारित अहवाल आयोगाला सादर करावा व त्याची एक प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१५.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संभाजी नारायण पवार
मु.पो.बांबवडे, ता. शिराळा, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सांगली — उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
शिराळा, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४५ + ५५४ / सांगली |
| २ | सुनावणीचो तारीख | दि. २०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. संभाजी नारायण पवार
मु.पो.बांबवडे, ता. शिराळा, जि. सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक,
भूमि अभिलेख, सांगली श्री. महेश म. शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका निरीक्षक भूमि अभिलेख,
शिराळा, जि. सांगली श्रीमती वर्षा सुनिल सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.११.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.२.२००८ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

बांबवडे, ता. शिराळा, जि. सांगली येथील गाव नकाशा, तसेच आपल्या कब्जे वहिवाटीतील जमिनीचा फाळणी नकाशा जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शिराळा व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांच्या पातळीवर दिला जात नाही. सन १९२२ ते १९३५-३६ सालच्या ई पत्रकाची प्रत दिली जात नाही. मोजणी खात्याने संबंधितांना नोटीस न देता चुकीच्या नोंदी केल्या आहेत. वारसा हक्काखाली बनावट नावे दाखल केली आहेत, फेरफाराची दखल घेऊन मूळ दाखला मिळत नसल्यास नवीन ७/१२ तयार करुन मिळावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री. संभाजी नारायण पवार यांनी केली.

ई पत्रक (जुना ७/१२, सन १९३५ ) हे महसुली अभिलेख असल्याने महसूल खात्याकडून प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सन १९५६ पर्यंतच्या फाळण्या बसविलेल्या असणाऱ्या बांबवडे गाव नकाशाची नक्कल देऊ केली असता अपीलकर्त्याने नाकारली. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिराळा, जि. सांगली यांच्याकडील नकाशामधून पाहणी करुन अपीलकर्त्यास हव्या असलेल्या नकाशाची प्रत देता येईल. सन १९३५-३६ नंतरचे अभिलेख उपलब्ध असून त्यातील कोणतीही माहिती अपीलकर्त्यास देता येईल, असे प्रतिपादन तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शिराळा श्रीमती वर्षा सुनिल सूर्यवंशी यांनी केले. जमिनीची नोंदणी, वारसा हक्काच्या नोंदी आदींबाबतच्या अपीलकर्त्यांच्या तक्रारी व मागण्या प्रशासकीय कार्यवाहीच्या असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत, असेही त्यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सन १९२२ पासूनची असून प्रशासकीय कार्यवाहीची मागणी वगळता ई पत्रक व मोजणीबाबतच्या तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, शिराळा यांच्याकडील नोंदी, तसेच तहसील कार्यालयातील नोंदी याची माहिती अपीलकर्त्यास दिली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शिराळा यांनी अपीलकर्त्यांच्या मागणी संदर्भातील सर्व अभिलेख अपीलकर्त्यास दाखवावे. तसेच तहसील कार्यालय, शिराळा यांनीही त्यांच्या कार्यालयाकडील अभिलेखाचे अवलोकन करु द्यावे व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती द्याव्यात. तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, शिराळा. यांनी याबाबत समन्वय साधून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १०.२.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ११.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. रघुनाथ सावळा जाधव — अपीलकर्ता
अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे
दक्षिणेस, जुना हायवे लगत, सातारा शहर, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, सातारा, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, सातारा
तहसील कार्यालय, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५१ + ५६७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.५.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. रघुनाथ सावळा जाधव<br>अनमोल, १३, कारंजकर उपनगर, गोडोलीचे<br>दक्षिणेस, जुना हायवे लगत, सातारा शहर, जि.<br>सातारा |
| | **जन माहिती अधिकारी** तथा | निवासी नायब तहसीलदार, सातारा<br>तहसील कार्यालय, सातारा श्री. प्र. सु. पिसाळ |

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५५१ / सातारा | २९.२.२००८ | १४.३.२००८ | १६.९.२०८ | -- |
| | २९.२.२००८ | ११.४.२००८ | ११.६.२००८ | २५.९.२००८ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या मालकीच्या जमिनीत जाण्या-येण्याचा रस्ता अन्य व्यक्तींनी अतिक्रमण करून अडविला आहे. त्याबाबत केलेल्या तक्रारीनुसार अतिक्रमण हटविण्याच्या आदेशाची प्रत द्यावी व अतिक्रमण करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, (अपील क्र. ५६७), जमिनीला चुकीची व बेकायदेशीर नावे लावली आहेत. चुकीच्या वारसांच्या नोंदी दुरूस्ती करून ७/१२ आपल्या नावाचे मिळावेत (अपील क्र. ५५१ ) अशी मागणी वारंवार करुनही त्यानुसार कार्यवाही केली जात नाही व माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रघुनाथ सावळा जाधव यांनी केली.

मयत वारसांचा मृत्यू दाखला देऊन नवा अर्ज करण्याची विनंती अपीलकर्ता श्री. जाधव यांना केली. परंतु तसा अर्ज देण्यास ते तयार नाहीत. वारस नोंदीचे हे प्रकरण प्रलंबित आहे. त्यांची मागणी हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग असून दोन खाजगी व्यक्तींमधील वादाचा विषय आहे. तरीही त्यात लक्ष घालण्याची सूचना मंडल अधिकारी यांना दिली आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, सातारा श्री. उदयसिंह भोसले यांनी केले.

प्रशासकीय कार्यवाही करून माहिती द्यावी, अशा स्वरूपाची अपीलकर्त्याची मागणी आहे. अशा प्रकारची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती' या संज्ञेत समाविष्ट होत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २७.१.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश खंडू जाधव
मु.पो.वाटंगी, ता.आजरा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, कोल्हापूर जिल्हा
मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश खंडू जाधव
मु.पो.वाटंगी, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा व्यवस्थापक, कोल्हापूर जिल्हा
मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर श्री.आर.एल.मिठारी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.७.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

शेतीसाठी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने कर्जमाफीबाबतचे परिपत्रक देण्यात यावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.सुरेश खंडू जाधव यांनी केली.

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासनाचे भागभांडवल अथवा अन्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक मदत मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच) अन्वये ही बँक 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही. तरीही पारदर्शकतेच्या दृष्टिकोनातून माहिती दिली जाते. संबंधित परिपत्रक प्राप्त करून देण्यात येईल, असे निवेदन बँकेचे प्रतिनिधी श्री.आर.एल.मिठारी यानी केले. संबंधित परिपत्रक अपीलकर्त्यास देण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले व त्यानुसार रजिस्टर्ड टपालाने परिपत्रक अपीलकर्त्यास पाठविल्याचे बँकेचे व्यवस्थापक, लवाद विभाग श्री.एस.एम.कारंबे यांनी बँकेच्या दि.११.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याची भूमिका कायम ठेवून पारदर्शकतेच्या दृटिने माहिती देण्याची बँकेची भूमिका उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र निवृत्ती ढोणे
२३१, रामाचा गोट, सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र निवृत्ती ढोणे
२३१, रामाचा गोट, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि.सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.८.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकामध्ये एकमत न झाल्याने दि.६.५.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जिल्हानिरीक्षक, दारूबंदी उत्पादन शुल्क, सातारा यांच्या कार्यालयाचे स्थलांतर केल्यानंतर ती जागा कामगार समाजकल्याण विभागाला देण्याचे आदेश सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांनी दि.३१.३.१९६० च्या पत्रान्वये दिले होते. फक्त इमारत ताब्यात देण्याचे आदेश असताना एकूण ११ एकर २९ गुंठे मोकळी जागा इमारतीसह कामगार व समाजकल्याण विभागाने ताब्यात घेतली आहे. याबाबतची माहिती देण्यात विविध खात्यांकडून टोलवाटोलवी करण्यात आली व दिलेली माहिती अपुरी, असंबध्द आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रविंद्र निवृत्ती ढोणे यांनी केली.

श्री.ढोणे यांच्या अर्जाबाबत विहित मुदतीत कार्यवाही करण्यात आली. उपलब्ध माहिती त्वरित दिली. परंतु ४८ वर्षांपूर्वीच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध नाही. इतर विभागांकडे याबाबतची माहिती असल्यास देण्याबाबत कळविले. परंतु माहिती मिळाली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा श्री.एस.एन.सावंत यांनी नमूद केले. कोणाला कोणती जागा द्यावयाची हे जिल्हाधिकारी ठरवितात. त्यांच्याकडेही संबंधित माहितीबाबत पत्रव्यवहार केला आहे. संबंधित जागा ताब्यात ठेवण्याचा कामगार व समाजकल्याण विभागाला अधिकार नाही, हा श्री.ढोणे यांच्या मागणीतील मुद्दा प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत त्याची दखल घेता येणार नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा यांचे प्रतिनिधी श्री.शु.अ.रामपुरे यांनी केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाने वरिष्ठ कार्यालयाकडून व जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून याबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी पत्रव्यवहार करावा व त्यांच्याकडून प्राप्त उत्तरासह अहवाल आयोगाला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सातारा श्री.एस.ए.रामपुरे यांनी दि.७.५.२००९ ने उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा, तहसीलदार, सातारा, मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा व अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, सातारा यांना कळविले. मात्र त्यावर या कार्यालयांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्याच्या मागणीनुसार संबंधित विषयातील कार्यवाहीबाबतची सार्वजनिक बांधकाम विभागाने वरिष्ठ कार्यालयाकडून व जिल्हाधिकारी, सातारा यांच्याकडून माहिती उपलब्ध करून देण्यासाठी पत्रव्यवहार केला असतानाही या कार्यालयांनी अहवाल पाठविलेला नाही, असे निदर्शनास आले आहे. वरील कार्यालयांनी त्यांचा अहवाल दि.२५.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करण्याची दक्षता घ्यावी अन्यथा संबंधित कार्यालयाचे प्रशासकीय प्रमुख कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि.१५.२.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**प्रत::**विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना पुढील कारवाईसाठी.

२/- जिल्हाधिकारी, सातारा, उपविभागीय अधिकारी, सातारा उपविभाग, सातारा, मुख्याधिकारी सातारा नगरपरिषद, सातारा व तहसीलदार, सातारा यांनी त्यांचा अहवाल आयोगास वेळेत पाठविण्याबाबत दक्षता घेण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामसिंग भगवान चव्हाण
तहसील कार्यालय वाई, जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी उपजिल्हाधिकारी,
जि.नंदुरबार

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** लेखाधिकारी,
लेखा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार, जि.नंदुरबार

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **५६/२०१०/ सातारा** |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | **दि. ८-१०-२००९** |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** परिविक्षाधीन नायब तहसीलदारांच्या वरिष्ठ वेतनश्रेणी फरकाची रक्कम न देण्याची कारणे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रामसिंग भगवान चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** २७-०१-२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश निवृत्ती देसाई (अपीलकर्ता अ.क्र.५६१/सातारा व मूळ अर्जदार)
१८७, शनिवार पेठ, मुळीक लेन, हेडपोस्टाजवळ, कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट,
३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा (अ.क्र.५६१/सातारा)
उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट,
३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा

(२)**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक),
सातारा जिल्हा परिषद सातारा (अ.क्र.६१४/सातारा)

(२)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, श्री शिवाजी विद्यालय,
मु.पो.कार्वे, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.६१४/सातारा)

(३)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, विठामाता विद्यालय व
कनिष्ठ महाविद्यालय, ३३३, शिवाजी हौसिंग सोसायटी, कराड, जि.सातारा(अ.क्र.६१५/सातारा)

(४)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका, श्री शिवाजी विद्यालय,
३१३, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा (अ.क्र.६१६/सातारा)

(५)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, देशभक्त भिकोबा आप्पाजी साळुंखे
विद्यालय, मु.पो.किवळ, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.६१७/सातारा)

(६)**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, श्री शिवाजी विद्यालय, मसूर,
मु.पो.मसूर, ता.कराड, जि.सातारा (अ.क्र.६१८/सातारा)

(७)**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ मुख्याध्यापिका, आदर्श प्राथमिक शाळा,
३१३, बुधवार पेठ, कराड, जि.सातारा (अ.क्र.५९६/सातारा)

(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोल्हापूर (अ.क्र.५८३/सातारा)

(८)**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण
सायन्स कॉलेज, कराड, जि.सातारा

(३)**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण, कोल्हापूर (अ.क्र.५८७/सातारा)

(९)**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, वेणूताई चव्हाण कला व वाणिज्य
महाविद्यालय कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५६१ +५७९/२००९ ते ५८७/२००९+ ५९६+ ६१४ ते ६१८ /सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता (अ.क्र.६१४/सातारा)व मूळ अर्जदार** श्री.सुरेश निवृत्ती देसाई
१८७, शनिवार पेठ, मुळीक लेन, हेडपोस्टाजवळ, कराड, जि.सातारा

(१)**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट,
३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा
श्री.गोरखनाथ मारूती जाधव

(१)**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट,
३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा
श्री.प्रकाश पांडुरंग पाटील

| ३ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५६१/सातारा | १३.९.२००८ | ८.१०.२००८ | ३.११.२००८ | -- |
| ६१४/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ६१५/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २३.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ६१६/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ६१७/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ६१८/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५९६/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५७९/२००९ ते ५८२/२००९ /सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५८३/सातारा | ११.११.२००८ | ५.१२.२००८ | २३.१२.२००८ | -- |
| ५८४/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५८५/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५८६/सातारा | १.११.२००८ | २९.११.२००८ | २२.१२.२००८ | २८.१.२००९ |
| ५८७/सातारा | ११.११.२००८ | ५.१२.२००८ | २३.१२.२००८ | -- |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९(अ.क्र.५६१/सातारा), १६.४.२००९ (अ.क्र.६१४/सातारा ते ६१८/सातारा), रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय घटकात एकमत न झाल्यामुळे वरील सर्व अपिलांची सुनावणी दि.१८.३.२००९ रोजी घेण्यात आली.

श्री शिवाजी एज्युकेशन सोसायटी कराड / श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, कराड / श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराड यांच्या संदर्भातील प्रशासकीय कामकाजाची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा क्र.१ ते ९ यांच्याकडे मागितली होती. सन १९४५ ते २००८ या काळातील

४० मुद्दयांची आपण मागितलेली माहिती उपलब्ध असूनही संस्था देत नाही. आपण माहितीचा दुरूपयोग करतो, म्हणून माहिती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील चुकीच्या कलमांचा आधार घेऊन (८(१)(२)(३)) माहिती नाकारून संस्था आपल्याला मानसिक त्रास व आर्थिक तोशीस देत आहे. संस्था माहितीच देत नाही, तर तिचा दुरूपयोग केला असे कसे म्हणता येईल. संस्थेविरूध्द न्यायालयात आपण दाखल केलेली चार प्रकरणे प्रलंबित असून तेथे सादर करण्यासाठी ही माहिती मिळणे महत्त्वाचे आहे. सातारा येथील न्यायालयात १२ दाव्यात संस्थेच्या बाजूने व एका दाव्यात आपल्या बाजूने निकाल झाला आहे. उच्च न्यायालयात तीन प्रकरणे दाखल आहेत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुरेश निवृत्ती देसाई यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८ घ प्रमाणे माहिती नाकारली. श्री.देसाई संस्थेत नोकरीला होते. त्या काळात त्यांनी केलेल्या गैर व शिस्तभंगाच्या कृत्यांमुळे त्यांना दोषारोपपत्र देऊन, खातेनिहाय चौकशी करून त्यांना संस्थेने नोकरीतून कमी केले. त्यामुळे संस्थेला त्रास देण्यासाठी विविध पातळ्यांवर अर्ज पत्रव्यवहार व दावे श्री.देसाई दाखल करीत आले आहेत. न्यायालयातील १३ प्रकरणे संस्थेने दाखल केलेली नाहीत. अपीलकर्त्यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार न्यायालयाने दाव्यात संस्थेचा समावेश केला, त्यातील १२ प्रकरणी संस्थेच्या बाजूने निकाल लागला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा श्री.प्रकाश पांडुरंग पाटील यांनी केले.

संस्थेचे सचिव श्री.प्रकाश पांडुरंग पाटील यांची जन माहिती अधिकारी म्हणून संस्थेने नेमणूक केली आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री.प्रतापराव ज्ञानोबा चव्हाण यांचे अचानक निधन झाल्याने व त्यांच्या जागी नव्या अध्यक्षांची नेमणूक काही अडचणीमुळे होऊ न शकल्याने अपिलीय प्राधिकाऱ्यांची नेमणूक होऊ शकली नव्हती. त्यानंतर श्री.गोरखनाथ मारूती जाधव यांची अपिलीय

प्राधिकारी म्हणून नियुक्ती झाली, असे संबंधित कागदपत्रांसह श्री.जाधव यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालयासह विविध कार्यालयांना व आयोगाला कळविले.

श्री.देसाई यांनी ६० वर्षांहून अधिक काळातील व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली आहे. माहितीचा अधिकार कायद्याचा ते गैरवापर करीत आहेत, तरीही माहिती देण्याची तयारी संस्थेने नेहमी दर्शविली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा श्री.गोरखनाथ मारूती जाधव यांनी केले.

संस्था रजिस्टर नसताना व संस्थेचे सर्व कायदेशीर पदाधिकारी मयत असताना बेकायदेशीर कारभार चालला आहे. संस्थेतील दोषी लोकांनी जनतेची व शासनाची फसवणूक करून कोट्यावधी रूपयांचे गैरव्यवहार केल्याने तेरा व्यक्तींवरील फौजदारी गुन्ह्याचा पोलीस तपास कराड न्यायालयाच्या आदेशाने चालू आहे, असे प्रतिपादन श्री.देसाई यांनी केले.

श्री.देसाई यांनी मागितलेली माहिती साठ वर्षांच्या काळातील विस्तृत स्वरूपाची अशी आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर माहिती संकलित करून देता येणार नाही, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे रास्त आहे. म्हणून अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून द्यावेत व त्यातील हवी असलेली माहिती अपीलकर्त्याने स्वतंत्र अर्जाद्वारे नोंदवून मागणी करावी. त्यानुसार अभिलेख अवलोकन व माहिती यासाठी नियमानुसार योग्य ते शुल्क आकारून जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास माहिती द्यावी. ही सर्व कार्यवाही १५ दिवसात पूर्ण व्हावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दि.१.४.२००९ रोजी श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराड येथील कार्यालयात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या वेळेनुसार अभिलेख पाहण्यासाठी आपण उपस्थित होतो. परंतु कोणतीही कागदपत्रे पाहावयास न देता, त्यापूर्वीच कागदपत्रे पाहण्यास दिल्याच्या प्रोसिडिंग बुकावर सही करण्यास सांगण्यात आले. आपण ते नाकारले. जन माहिती

अधिकारी जाणूनबुजून आपल्याला माहिती नाकारत आहेत, त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.देसाई यांनी दि.१८.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

श्री.देसाई यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा या संस्थेच्या सातारा जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालये याबाबत माहिती मागणारी अकरा अपिले केली होती. त्या संदर्भातील अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी आदेश देऊनही संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याला माहिती दिली नाही, तसेच अपील क्र.५६१/सातारा मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार अभिलेख अवलोकनासाठीही दिले नाहीत. अशी तक्रार करून श्री.देसाई यांनी अपील क्र.५६१/सातारा, ५७९/२००९ ते ५८७/२००९/सातारा ही अपिले राज्य माहिती आयोगाकडे केली आहेत.

उपरोक्त अपिलांमधील अर्जांच्या संदर्भात श्री.देसाई यांनी केलेल्या अपिलांवर आपली बाजू ऐकून न घेता अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी माहिती देण्याबाबत एकतर्फी आदेश दिला, आपली बाजू मांडण्याची नैसर्गिक न्यायाची संधी मिळालेली नाही, म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा यांचे जन माहिती अधिकारी तथा क्र.२ ते ७ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र.६१४/सातारा ते ६१८/सातारा व ५९६/सातारा केलेली आहेत. दि.१६.४.२००९ च्या विशेष अपील कार्यक्रमांत या अपिलांचा समावेश होता. अपील क्र.५६१/सातारा मध्ये आयोगाने दिलेल्या आदेशानुसार श्री.देसाई यांना कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन नियमानुसार शुल्क आकारून माहिती देण्याची सूचना संस्थेने सर्व शाखांना लेखी कळविली होती. परंतु श्री.देसाई यांनी त्यानुसार पाहणी केली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रपत्रात नमूद केले आहे.

श्री.देसाई यांची अपील क्र.५६१/सातारा व अन्य सर्व अपिलांच्या संदर्भात अभिलेख अवलोकनाबाबत केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा श्री.प्रकाश

पांडुरंग पाटील यांनी दि.११.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता श्री.देसाई यांना संस्थेने माहिती देऊ केली आहे. अभिलेख अवलोकनाची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत उभय बाजू परस्परांवर आरोप / प्रत्यारोप करीत आहेत. हे लक्षात घेता शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा व श्री.गोरखनाथ मारूती जाधव यांनी आपल्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत अपीलकर्ता श्री.सुरेश निवृत्ती देसाई यांना अभिलेखाचे अवलोकन करू देण्याची कार्यवाही पार पाडणे अधिक उचित ठरेल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) उपरोक्त सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.सुरेश निवृत्ती देसाई यांना श्री शिवाजी शिक्षण संस्था ट्रस्ट, ३१३, बुधवार पेठ, शिवाजीनगर, कराड, जि.सातारा या शिक्षण संस्थेकडील अभिलेखांचे अवलोकन करू देण्याची कार्यवाही शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी आपल्या कार्यालयीन प्रतिनिधीच्या उपस्थितीत दि.१०.३.२०१० पर्यंत पार पाडावी. अपीलकर्ता व संस्थेचे जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी ठरविलेल्या वेळापत्रकानुसार ही प्रक्रिया पूर्ण करावी. संपूर्ण कार्यवाहीबाबतचा अहवाल शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सातारा यांनी दि.१५.३.२०१० पर्यंत आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १५.२.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक श्रीपती चव्हाण
मु.पो.इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी),
पंचायत समिती, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक श्रीपती चव्हाण
मु.पो.इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी (उच्च श्रेणी), पंचायत समिती, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर तत्कालीन-श्री.रावसाहेब हरीबा चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.सदाशिव रामा जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.४.२००८ व ५.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.५.२००८ व ४.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

ग्रामपंचायत हद्दीतील वृक्षतोडीबाबतची अपुरी व चुकीची माहिती दिली. तसेच दलित वस्ती सुधारणेबाबतची माहिती पावतीवार न देता एकत्र दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक श्रीपती चव्हाण यांनी केली.

वृक्षतोडीसह सर्व माहिती श्री.चव्हाण यांना देण्यात आली. वारंवार अर्ज करून विविध स्वरूपाची माहिती ते मागत असतात. त्या त्या वेळी त्यांना ती दिली जाते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत इंगळी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.सदाशिव रामा जाधव यांनी केले.

श्री.चव्हाण यांनी आयोगाकडे केलेले अपील अन्य अर्जाच्या संदर्भातील आहे. अनेक अर्ज व अपिले यात ते नेमकेपणा राखत नाहीत, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.रावसाहेब हरीबा चव्हाण यांनी नमूद केले.

अपीलकर्त्याने त्या त्या अर्जासंदर्भातील मुद्देच संबंधित अपिलात मांडले पाहिजेत. मूळ अर्ज वेगळा व अपील वेगळ्या अर्जाच्या संदर्भातील , ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी योग्य कार्यवाही केली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.१.२०१०